॥ माझे जीवन गाणे ॥

गायकः पं. जितेंद्र अभिषेकी
गीतः मंगेश पाडगांवकर
संगीतः पु. ल. देशपांडे

माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे! ॥ धृ. ॥

व्यथा असो आनंद असू दे
प्रकाश किंवा तिमिर असू दे
वाट दिसो अथवा न दिसू दे, गात पुढे मज जाणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे! ॥ १ ॥

कधी ऐकतो गीत झर्यातुन
वंशवनाच्या कधी मनातुन
कधी वार्यातुन, कधी तार्यातुन झुळझुळतात तराणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे! ॥ २ ॥

तो लीलाघन सत्य चिरंतन
फुलापरी उमले गीतातुन
स्वरास्वरातुन आनंदाचे नित्य नवे नजराणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे! ॥ ३ ॥

या विहगांनो माझ्यासंगे
स्वरांवरी हा जीव तरंगे
तुमच्यापरी माझ्याही स्वरांतुन उसळे प्रेम दिवाणे
माझे जीवन गाणे, माझे जीवन गाणे! ॥ ४ ॥